# उत्तर प्रादेशिक विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, गु.अ.वि. मुंबई

## प्रेस नोट

**इंटरनेटच्या माध्यमातून शेअर ब्रोकर कंपनीच्या ग्राहकांची माहिती प्राप्त करून ग्राहकांचे समभाग परस्पर विक्री करणा-या टोळीतील गुन्हेगारांना उत्तर प्रादेशिक विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडून शिताफीने जेरबंद.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | - | उत्तर प्रादेशिक विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई |
| २ | गु.र.क्र. व कलम | - | गु.र.क्र. २४/२०२२ कलम ४१९, ४२०, ३४ भादवि. सह कलम ६६(क) ६६ (ड) मा.तं.का. |
| ३ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | - | दि. २५/०५/२०२२ ते दि. ०८/०६/२०२२ रोजीपर्यंत |
| ४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | - | दिनांक २३/०६/२०२२ रोजी १४:०० वा. (ठा. दै. क्र. ०७/२०२२) |
| ५ | गुन्हयाचे ठिकाण | - | निर्मल बंग सिक्युरिटीज प्रा. लि. या कंपनीचे आयटी सेल २०१, खंडेलवाल हाऊस, २रा माळा, पोददार रोड, पोददार पार्क, मालाड पूर्व, मुंबई ९७. |
| ६ | फिर्यादीचे नाव | - | किशोरकुमार लक्ष्मीनारायण अग्रवाल, वय ५५ वर्षे |
| ७ | फसवणुक केलेली रक्कम | - | ३,५८,३४,२५९/- |
| ८ | अटक आरोपी | - | १) एक पुरुष वय २८ वर्षे रा.ठी. मिरा रोड, ठाणे<br>२) एक पुरुष वय ३३ वर्षे रा.ठी. अहमदाबाद राज्य गुजरात<br>३) एक पुरुष वय ५७ वर्षे रा.ठी. अहमदाबाद राज्य गुजरात<br>४) एक पुरुष वय ३३ वर्षे रा.ठी. बांद्रा, मुंबई<br>५) एक पुरुष वय २८ वर्षे रा.ठी. नालासोपारा, पालघर |
| ९ | तपासी अधिकारी | - | सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप पाचांगणे,<br>वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय चंदनशिवे |
| १० | हस्तगत केलेली रक्कम | - | नमुद गुन्हयात फसवणुक झालेली रू. ३,५८,३४,२५९/- एवढया किंमतीचे समभाग/रक्कम गोठवण्यात आली आहेत. |

यातील तक्रारदार यांचे दि. २४/०५/२०२२ रोजी ते दि. ०८/०६/२०२२ रोजीच्या दरम्यान त्यांच्या निर्मल बंग सिक्युरिटीज प्रा.लि. या कंपनीचा अधिकृत व्हॉटस्अॅप क्रमांक फिर्यादी यांच्या कंपनीच्या ताब्यात असताना देखील सदर क्रमांकाचा संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून वापर करून कंपनीच्या ग्राहकांना कंपनीचे अधिकृत स्टाफ बोलत असल्याचे सांगून कंपनीच्या ग्राहकांना विश्वासात घेऊन त्यांच्याकडून ओटीपी प्राप्त करून ग्राहकांचे निर्मल बंग सिक्युरिटीज प्रा.लि. याचे बियॉड या मोबाईल ट्रेडिंग अॅपचा अॅक्सेस घेतला. त्यांनतर सदर ग्राहकांच्या डिमॅट खात्यावर असलेले विविध कंपन्यांचे शेअर त्यांच्या संमतीशिवाय विक्री करून त्यातून त्यांच्या डिमॅट खात्यावर जमा झालेल्या रक्कमेतून दुसऱ्या एका कंपनीचे शेअर खरेदी करून ग्राहकांची एकूण ३,५८,३४,२५९/- एवढी फसवणुक केली म्हणून फिर्यादी यांनी उत्तर प्रादेशिक विभाग सायबर पोलीस ठाणे येथे दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीतांविरूध्द् वर नमूद गुन्हा नोंद करण्यात आला.

नमूद गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय चंदनशिवे, पोनि मंगेश देसाई, सपोनि संजय पवार, सपोनि संदिप पाचांगणे, पो.ना. सावंत, पो.ना. शिंदे व पो.ना. आयरे, मपोना दळवी हे पथक करत होते. नमूद गुन्हयाच्या तपासात सपोनि संदीप पाचांगणे व पोलीस पथक यांनी प्राप्त विविध तांत्रिक गोष्टी, आरोपीतांनी सदरचा गुन्हा करण्यासाठी वापरलेली विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे यांचा सखोल व बारकाईने तपास केला असता नमूद गुन्हयात अहमदाबाद, मुंबई व युके येथील आरोपीत इसमांचा सहभाग असल्याची खात्री झाली.

त्यांनतर पोलीस पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे ०२ पुरूष आरोपी रा.ठी. मिरा रोड, ठाणे व नालासोपारा, जि. पालघर येथुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे केलेल्या तपासात त्याचा सहभाग निष्पण्ण झाल्यावरून त्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांनतर ०१ पुरूष आरोपी रा.ठी. बांद्रा, मुंबई येथुन अटक करण्यात आली. तसेच अधिक तपासात ०२ आरोपी रा.ठि. अहमदाबाद, राज्य गुजरात त्यापैकी एक आरोपी यास अहमदाबाद राज्य गुजरात या ठिकाणी जावुन व दुसरा आरोपी यांस दहिसर, मुंबई याठिकाणाहुन पोलीस पथकाने अटक केली आहे. अद्यापपर्यंत प्रस्तुत गुन्हयात एकुण ०५ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. तसेच अटक आरोपीतांकडे पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या तपासात यातील अटक आरोपीतांनी ग्राहकांना संपर्क करण्यासाठी ग्रेट ब्रिटन या देशात राहणा-या त्यांच्या एका साथीदाराकडुन इन्टरनेटच्या माध्यमातुन संपर्क केल्याचे निष्पण्ण झाले असुन नमुद गुन्हयात आंतरराष्ट्रीय टोळीचा सहभाग आहे की कसे यादृष्टीने तपास चालु आहे.

उत्तर प्रादेशिक विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई यांच्याकडून जनतेस आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारची फसवणुक झाल्यास *www.cybercrime.gov.in* या पोर्टलवर जावुन तक्रार नोंदवावी अथवा १९३० या क्रमांकावर संपर्क साधुन त्यांच्यासोबत झालेल्या फसवणुकबाबतची माहीती तात्काळ द्यावी किंवा संबंधित कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधी अथवा कार्यालयाशी संपर्क साधावा. सोशल मिडियावर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही संदेशाबाबत जागरूकतेने व खात्रीकरून प्रतिसाद द्यावा. आपली अशाप्रकारे फसवणुक झाली असल्यास किंवा आपणांस अशा प्रकारची माहिती प्राप्त झाल्यास त्याची माहिती तात्काळ स्थानिक पोलीस ठाणे अथवा सायबर पोलीस ठाणे मुंबई यांना द्यावी.

सदरची प्रभावी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. सुहास वारके, मा. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री एस. विरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त, (सायबर गुन्हे) श्री. हेमराजसिंह राजपूत, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. रामचंद्र लोटलीकर, व वपोनि विजय चंदनशिवे यांच्या मार्गदर्शानाखाली पोनि मंगेश देसाई, सपोनि संजय पवार, सपोनि संदिप पाचांगणे, पो.ना. सचिन सावंत, पो.ना. अशोक शिंदे व पो.ना. गणेश आयरे, मपोना सोनाली दळवी यांनी यशस्वीपणे पार पाडली.

----oooo----